# वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती

शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी अकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रं. पमपजी-२००५ /प्र.क्र.१/आरोग्य-३ दिनांक १९ मार्च २००५

सदर शासन निर्णय १०० % अशासकीय अनुदानीत माध्यमिक शाळेतील १००% वेतनावरील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू आहे. त्यानुसार आकस्मिक उद्‌भवणा-या २७ आजारांवर व पाच गंभीर आजारावर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांचरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीचें शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेले रु. ४०,०००/- चे पुढील प्रस्ताव शिफारशीसह संचालनालयास सादर केले जातात.

## वैद्यकीय अग्रिम मंजूर होणेबाबत आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे

१. वैद्यकीय प्रस्तावाचे सुरुवातीला नमूद केलेल्या कागदपत्रांची अनुक्रमाणिका तसेच प्रत्येक पानावर पानाचा अनुक्रमांक देणे आवश्यक आहे.
२. सुधारीत ‘अ’ पत्रकावर शिक्षणाधिकारी माध्य यांची शिफारस आवश्यक आहे.
३. शाळा १०० % अनुदानीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र
४. सेवेत कायम असलेबाबत व संबंधितास महाराष्ट्र राज्य सेवा वैद्यकीय देखभाल नियम १९६१ मधील तरतूदी अनुज्ञेय असल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र

५. कुटूंब मर्यादीत असलेबाबत मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र, तसेच कुटूंबातील व्यक्तीचे संबंधीत कर्मचा-याशी असलेले नाते, वय व व्यवसाय यांचा उल्लेख असावा. विहित नमुन्यातील कुटूंब प्रमाणपत्र रेशनिंग कार्ड सत्यप्रत

६. संबंधित कर्मचा-याचे आईवडील यांच्या वैद्यकीय अग्रिमाची मागणी असल्यास त्यांचे वार्षिक उत्पन्न किती! त्यांना निवृत्ती वेतन वगैरे मिळत असल्यास ते किती व ते संबंधित कर्मचा-यावर सर्वस्वी अवलंबून असल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र

७. संबंधित कर्मचा-याचे अपत्यांचे बाबतीतही ते सर्वस्वी संबंधीत कर्मचा-यावर अवलंबून असल्याचे मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र

८. पती / पत्नी कोणत्या नोकरीत आहेत/नाहीत. नोकरीत असल्यास सदर खर्चासाठीची मागणी त्या आस्थापनेवरुन केली नसल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र

९. संबंधीत कर्मचा-याचे मासीक वेतन प्रमाणपत्र

१०. रुग्णालयातील वास्तव्याचा दाखला (शासन निर्णयानुसार)

११. लेखा परिक्षणात वैद्यकीय देयकाच्या रकमेची वसुली निघाल्यास सदर रक्कम एक रकमी वसूल करण्याबाबतचे हमीपत्र

१२. औषधामध्ये अन्न टॉनिक व अल्कोहोल इ. चा समावेश नसल्याबाबतवे प्रमाणपत्र

१३. तातडीचे वैद्यकीय प्रमाणपत्र

१४. ॲडमिट व डिसचार्ज कार्ड (मूळप्रत)

१५. जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र

१६. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेसह एक वर्षाच्या विहित कालावधीमध्ये करावी.

१७. फक्त आंतररुग्ण कालावधीच्या बीले / पावत्या असाव्यात बाहयरुग्ण नसाव्यात.

१८. औषंधासाठी खर्च केलेल्या रकमेची मूळ पावत्यांवरुन स्वतंत्र यादी

१९. वैद्यकीय प्रस्तावासोबत खर्चाच्या मूळ पावत्या / बीले स्वतंत्र कागदावर क्रमाने चिकटवून जोडलेल्या असाव्यात.

२०. पूर्वी अग्रीम रक्कम घेतली होती काय? किंवा इतर संस्था / विमा कंपनी यांचेकडून आर्थीक मदत घेतली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

२१. वैद्यकीय प्रस्ताव विशेष बाब म्हणून का विचारात घ्यावा याचे संबंधीतांचे स्वयंस्पष्ट आर्थीक समर्थन

२२. 'क' व 'ड' फॉर्म पूर्ण भरलेले.

२३. वैद्यकीय प्रस्ताव धारक मुख्याध्यापक असल्यास त्यांचे प्रमापत्रकांवर संस्था प्रमूख / सचिव यांची स्वाक्षरी

२४. अपघातामुळे उद्‌भवणारे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती असेल तर पोलीस पंचनामा प्रत, अपघाताची नोंद पोलीस ठाण्यात केल्याची एफ. आय. आर. प्रत, अपघात भरपाई मागणी न केल्याचा तसेच पुढे न करण्याचा कर्मचा-याचा दाखला, विमा कंपनीकडून अपघात भरपाई घेतली किंवा कसे याचा खुलासा.

२५. विवाहीत स्त्री कर्मचारी असेल, जर तीने सासू / सास-यांचा किंवा आईवडीलांचा वैद्यकीय प्रस्ताव सादर केला असेल तर दोहोंपैकी एकाचा लाभ घेण्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे तसेच त्यांना पेन्शन मिळत असल्यास निवृत्तीवेतन आदेशाची प्रत, तसेच प्रतिज्ञापत्राची नोंद सेवापुस्तकात घेऊन सेवापुस्तकाच्या पानाची झेरॉक्स प्रत.

२६. संबंधीत कम्रचारी तरी १०० % अनुदानीत शाळेत कार्यरत असला तरी त्याची वैयक्तिक मान्यता १०० टक्के अनुदानीत असल्याची खातरजमा (कोणत्याही परिस्थितीत काम विना अनुदानीत, विना अनुदानीत किंवा अंशतः अनुदानीत तुकडीवरील कर्मचा-याचे वैद्यकीय देयक सादर होणार नाही याची दक्षता घ्यावी.) पुराव्यासहीत करण्यात येऊन तसे करावे.

२७. संबंधित कर्मचा-याची मुले/भाऊ नोकरी करीत असतील तर त्यांनी सदर खर्चाची मागणी त्यांचे आस्थापनेवरुन केली नसल्याचे प्रमाणपत्र

२८. वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती / अग्रिम मागणारा संबंधित कर्मचारी ज्या खाजगी माध्यमिक शाळेत कार्यरत आहे त्या शाळेची मूळ शासन परवानगी सुरवातीस विना अनुदानीत व पुढे अनुदानीत तत्वावर मंजूर केल्याच्या शासन प्रती.